18 SEP 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
ाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईन व्यवहार करताना काळजी घ्या

## संदीप गादिया : चेंबर ऑफ कॉमर्स, शिवाजी विद्यापीठातर्फे चर्चासत्र

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर . ता. १७ : ऑनलाईन व्यवहार करताना काळजी घ्या असा सल्ला सायबर तज्ज्ञ संदीप गादिया यांनी व्यापारी-उद्योजकांना दिला. कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज व विधी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या चर्चासत्रात ते बोलत होते.

गादिया म्हणाले, 'मोबाईलचा वापर बंद झाल्यानंतर मोबाईल डाटा, वायफाय, ब्ल्यूटुथ बंद करायला विसरु नका. मोबाईलमध्येही अँटीव्हायरसचा वापर करा. पब्लिक चार्जिंग स्टेशनवर मोबाईल अजिबात चार्ज करु नका. ओटीपी न देताही हॅकर्स तुमच्या खात्यातील पैसे हडपू शकतो.



**कोल्हापूर : चेंबर ऑफ कॉमर्स व शिवाजी विद्यापीठ आयोजित चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी संदीप गादिया. व मान्यवर.**

त्यामुळे ऑनलाईन व्यवहार कमीच करा. क्रेडिट कार्डचा कार्ड प्रोटेक्शन विमा उतरुन घ्या. एटीएममधून पैसे काढताना एटीएम मशिन अधिकृत असल्याची खात्री करा. युपीआय ॲप्सवर एकच पासवर्ड न ठेवता वेगवेगळा ठेवा व पासवर्ड नेहमी बदलत रहा. सेक्सटॉर्शनमध्ये न घाबरता पोलिसांत तक्रार द्या.'

प्र. कुलगुरु पी. एस. पाटील यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. ते म्हणाले, 'सायबर गुन्हे रोखण्यासाठी गुन्हा होणारच नाही याची दक्षता घ्यावी.

चेंबरचे उपाध्यक्ष शिवाजी पोवार, संजय पाटील, मानद सचिव धनंजय दुग्गे, वैभव सावर्डेकर, राजू पाटील, खजिनदार हरीभाई पटेल, संचालक प्रशांत शिंदे, राहुल नष्टे, संपत पाटील, ॲड. इंद्रजित चव्हाण, विद्यापीठाचे कायदा सल्लागार संतोष शहा, कायदा अधिकारी अनुष्का कदम, चेंबरचे संचालक उपस्थित होते.

चेंबरचे अध्यक्ष संजय शेटे यांनी प्रास्ताविक केले. चेंबरच्या संचालिका सीमा जोशी यांनी सूत्रसंचालन केले. विधी अधीविभाग प्रमुख विवेक धुपदाळे यांनी आभार मानले.

18 SEP 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ज्ञान प्रत्यक्षात उतरवणे म्हणजे अभियांत्रिकी

## सी. एल. कोळी : शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात अभियांत्रिकी दिन उत्साहात




शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात शनिवारी अभियंता दिन साजरा झाला. या कार्यक्रमात सी. एल. कोळी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी जियाअहमद मोमीन, डॉ. जी. एस. कुलकर्णी, पी. पी. पुंगावकर, सुरेश पाटील, डॉ. एस. एन. सपली, महेश साळुंखे, पुनश्री फडणीस, आदी उपस्थित होते.

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विज्ञान म्हणजे ज्ञान आत्मसात करणे; पण अभियांत्रिकी म्हणजे मिळालेले ज्ञान प्रत्यक्षात उतरवणे, असे प्रतिपादन कऱ्हाड येथील महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण मंडळाचे अधीक्षक अभियंता सी. एल. कोळी यांनी केले.

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जन्मदिनी १५ सप्टेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या अभियंता दिनाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभाग, इंडियन सोसायटी फॉर हिटिंग, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग इंजिनिअर्स, रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग सर्व्हिसिंग सेक्टर सोसायटी आणि इन्स्टिट्यूशन इनोवेशन कौन्सिल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. कोळी यांनी यावेळी स्थापत्य अभियांत्रिकीतील संधीबद्दल माहिती दिली. अध्यक्षस्थानी उद्योजक जियाअहमद मोमीन होते. त्यांनी अभियांत्रिकीमधील मुख्य शाखा जोपासण्याचे विद्यार्थ्यांना आवाहन केले.

प्रारंभी डॉ. जी. एस. कुलकर्णी यांनी अभियंता दिनाचे महत्त्व सांगितले. आयएएसएसएसचे राष्ट्रीय उपाध्यक्ष पी. पी. पुंगावकर यांनी रेफ्रिजरेशन अँड एअर कंडिशनिंग सर्व्हिसिंग सेक्टर सोसायटीबद्दल माहिती दिली. आयएसएचआयएईचे सचिव सुरेश पाटील यांचेही भाषण झाले. तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. एस. एन. सपली यांनी अध्यक्षीय भाषण केले.

या कार्यक्रमाचे नियोजन डॉ. व्ही. एस. पाटील, एस. एम. भोसले, व्ही. के. कांबळे, वाय. एस. व्हटकर, ए. व्ही. रेणावीकर, टी. आर. पाटील, एम. ए. लोखंडे, ए. ए. कुलकर्णी यांनी केले.

# सायबर प्राबल्यामुळे एकांगी समाजनिर्मिती

## रणधीर शिंदे : परिवर्तनवादी चळवळीचाही अवकाश आक्रसतोय, विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सायबर समाजाच्या वाढत्या प्राबल्यामुळे मानवाचा तसेच परिवर्तनवादी चळवळींचा अवकाश आक्रसतो आहे. त्यातून एकांगी समाजनिर्मितीचा धोका मानवतेसमोर उभा आहे, असे प्रतिपादन मराठी साहित्याचे ज्येष्ठ समीक्षक डॉ. रणधीर शिंदे यांनी शनिवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्यावतीने आयोजित प्रभाकरपंत कोरगावकर व्याख्यानमालेमध्ये



'महाराष्ट्रातील समाजजीवन व परिवर्तन' या विषयावर ते बोलत होते. मानव्यशास्त्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन होते. पल्लवी कोरगावकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

डॉ. शिंदे म्हणाले, डिजिटल, संगणकीय व स्मार्टफोनसारख्या संवाद माध्यमांच्या अफाट उपलब्धतेमुळे आजची पिढी सायबर समाज बनली आहे. भास-आभासांच्या दुनियेमध्ये स्वमग्न समाज निर्माण होऊ पाहतो आहे. मानवाच्या बौद्धिकतेवर संशय व्यक्त व्हावे, इतके कृत्रिम बुद्धिमत्तेकडे आपण वळलो आहोत. यामुळे एकूणच मानवी सर्जनशीलता धोक्यात आली आहे. प्रभाकरपंत कोरगावकर यांनी सत्पात्री दान कसे असावे, याचा आदर्श आपल्या स्वतःच्या उदाहरणातून घालून दिला.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. महाजन यांनी व्याख्यानमालेअंतर्गत झालेल्या मान्यवर वक्त्यांची व्याख्याने संपादित ग्रंथरूपात प्रकाशन करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्न करेल, असे सांगितले.

या व्याख्यानमालेसाठी आणखी सव्वालाख रुपयांचा निधी कुलगुरूंकडे सुपूर्द करण्यात येईल, असे पल्लवी कोरगावकर यांनी सांगितले. डॉ. अविनाश भाले यांनी प्रास्ताविक केले.

18 SEP 2023
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशासाठी प्रामाणिक कष्ट, सेवेप्रति भक्ती हवी

## रघुनाथ मेडगे : विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आयुष्यात यशस्वी होण्यासाठी प्रामाणिक कष्ट आणि मनात सेवेप्रति भक्ती असणे नितांत आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुंबई डबेवाला संघटनेचे माजी अध्यक्ष रघुनाथ मेडगे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटमार्फत आयोजित इंडक्शन प्रोग्रॅममध्ये प्रमुख व्याख्याते म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख अध्यक्षस्थानी होते.

मेडगे म्हणाले, मुंबई डबेवाला संघटनेमध्ये पाच हजार सदस्य, ८०० मुकादम आणि ९ संचालक आहेत. मनुष्यबळाचे योग्य नियोजन, कामातील समन्वय आणि सदस्यांचा प्रामाणिक सहभाग यांच्या आधारे रोज चार लाख जेवणाच्या डब्यांची निर्धारित वेळेमध्ये देवाणघेवाण केली जाते. त्यामुळे संघटनेवर विश्वास ठेवणारे ग्राहक पूर्णपणे संतुष्ट व समाधानी आहेत. म्हणूनच मुंबई डबेवाला संघटनेच्या कार्यपद्धतीवर जगभरातील विविध नामवंत संस्थांनी संशोधन केले आहे, तर विविध माध्यमांनी माहितीपट बनविले आहेत.

डॉ. देशमुख यांनी यावेळी मार्गदर्शन केले. डॉ. नितीन माळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. उमेश गडेकर यांनी आभार मानले. डॉ. तेजश्री मोहरेकर यांनी सूत्रसंचालन केले.

लोकमत

# 'दूरशिक्षण'च्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातील बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी.(गणित), एम.बी.ए. या अभ्यासक्रमातील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आज, सोमवारी दुपारी १२ वाजता ऑनलाइन पद्धतीने आयोजित केल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली.

पुढारी

# बी. टेक. अभ्यासक्रमाच्या इयर डाऊन विद्यार्थ्यांची ४ ऑक्टोबरपासून पुरवणी परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने संलग्न महाविद्यालयातील बी. टेक (सीबीसीएस) अभ्यासक्रमाच्या प्रथम ते अंतिम वर्षातील इयर डाऊन विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा घेतली जाणार आहे. ४ ऑक्टोबरपासून पुरवणी परीक्षेला प्रारंभ होणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करिता अभियांत्रिकी व तंत्रज्ञान शाखेतंर्गत संलग्न महाविद्यालयातील बी.टेक. (सीबीसीएस) अभ्यासक्रमाच्या प्रथम ते अंतिम वर्षातील इयर डाऊन विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा घेण्यास अधिकार मंडळाने मंजुरी दिली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना २० ते २२ सप्टेंबरदरम्यान विनाविलंब शुल्क अर्ज करता येणार आहे. महाविद्यालयाने दि. २२ रोजी परीक्षा अर्ज अॅप्रुव्ह करायचे आहेत. महाविद्यालयांनी परीक्षा अर्ज २५ सप्टेंबरपर्यंत विद्यापीठात जमा करणे आवश्यक आहे. पुरवणी परीक्षेसाठी उत्तरपत्रिकेची छायांकित प्रत, पुनर्मूल्यांकन व पुनर्पडताळणी सुविधा उपलब्ध असणार नाही, अशी माहिती विद्यापीठ परीक्षा विभागाने दिली आहे.